# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि —४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर,२०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ.)

## *आस्थापना विभाग*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली जि. गडचिरोली — ४४२६०५
दुरध्वनी क्रमांक : ०७१३२—२२३११७ email : establishment.section@unigug.ac.in

जा.क्र/आस्थापना/परिपत्रक/२०५४/२०२४.                दिनांक : २२/०७/२०२४.

## परिपत्रक

**संदर्भ** : १)मा.जिल्हाधिकारी,गडचिरोली यांचे आदेश क्रमांक जि.का./क्र.कार्या—३/अका. आव्यक/कावि—१०१८/२०२४,दिनांक २२ जुलै २०२४.

सर्व संबधितांना सूचित करण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी गडचिरोली जिल्हा यांनी संदर्भीय आदेशानुसार गडचिरोली जिल्हयामध्ये मागील ४ दिवसांपासून मुसळधार पाऊससह अतिवृष्टी झाल्यामूळे जिल्हयातील नद्यांच्या पाण्याची पातळी वाढल्यामूळे नद्या व नाल्यांना पूर आलेला आहे. तथापि गडचिरोली जिल्हयातील पूरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून **विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेतेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण गडचिरोली जिल्हयातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांकरिता दिनांक २३ जुलै २०२४ रोजीची सुटटी जाहिर केल्याचे संदर्भीय पत्रानुसार आदेश निर्गमित केलेले आहे.**

त्याअनुषंगाने खुद विद्यापीठ व विद्यापीठ परिक्षेत्रामधील, गडचिरोली जिल्हयातील घटक व संलग्नित महाविद्यालये आणि सर्व शैक्षणिक विभागांना दिनांक २३ जुलै २०२४ रोजीची सुटटी जाहीर करण्यात येत आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांनी जिल्हयात होत असलेली अतिवृष्टी व पूरपरिस्थिती लक्षात घेता घराबाहेर पडू नये व काळजी घ्यावी.

मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :**

१. विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांचे सर्व सन्माननीय सदस्य
२. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
३. विद्यापीठ **गडचिरोली जिल्हयातील** घटक व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.

यांना विनंती करण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या शैक्षणिक विभाग/ महाविद्यालये/ सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या (गडचिरोली जिल्हा) निदर्शनास आणून दयावे.